महाराष्ट्र शासन

क्रमांक: एनजीसी ३५९५/समवि/[१३७/९५]/मशि-३
उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ४ ऑगस्ट, १९९५

प्रति,

कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

विषय:- सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखांची नविन महाविद्यालये उघडण्यास परवानगी...

महोदय,

सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून नविन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनास प्राप्त झालेले अर्ज/शिफारशींचा विचार करुन पुढे नमूद केलेल्या संस्थेस १९९५-९६ पासून नविन महाविद्यालय उघडण्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२[५] अनुसार शासन खालीलप्रमाणे परवानगी देत आहे :-

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा |
|---|---|---|
| शिक्षण समिती नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर. | नेसरी | कला व वाणिज्य |

२. शासनाने दिलेली सदर परवानगी पुढील अटींवर आहे :-

१] सदर महाविद्यालयास देण्यात आलेली परवानगी विना अनुदान तत्वावर असून या विभागाच्या शासन निर्णय क्र. एनजीसी २०९१/[३५६७]/विशि-२,अ दि. ८.८.१९९१ अन्वये लागू करण्यात आलेल्या सूत्रानुसार व वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या अनुदान संदर्भातील शासन निर्णयातील अटींच्या अधिन राहून सदर महाविद्यालयास अनुदान तत्वावर आणण्याचा विचार यथावकाश करण्यात येईल.

२] ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे त्या प्रत्येक विद्याशाखेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात कमीत कमी ६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ष १९९५-९६ पासून वर्ग सुरु करावा.